सरनाईक यांच्या पत्रावर सेनेची सावध प्रतिक्रिया भाजपकडून स्वागत

मुंबई, दि. २१ :: शिवसेनने पुन्हा भाजपशी युती करावी या शिवसेना आमदार प्रताप सरनाईक यांच्या पत्रावर राजकीय वर्तुळात प्रतिक्रिया उमटली असून, ही सच्च्या शिवसेना कार्यकर्त्यांची भावना असल्याचे मत भाजपने व्यक्त केले. महाविकास आघाडी सरकारला काही धोका नसल्याचे काँग्रेस व राष्ट्रवादीने स्पष्ट के ले तर केंद्रीय तपास यंत्रणांच्या जाचामुळेच सरनाईक यांनी ही भावना व्यक्त केल्याचे शिवसेनेने म्हटले आहे.

शिवसेना आमदार प्रताप सरनाईक यांनी सच्च्या शिवसेना कार्यकर्त्यांची भावना पत्रातून व्यक्त केली आहे, असे भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी सांगितले. काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस बरोबरची शिवसेनेची आघाडी ही अनैसर्गिक असल्याचे आम्ही गेले दीड वर्ष सांगत आहोत. काँग्रेसने कायमच अल्पसंख्याकांचे लांगूलचालन केले. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी या पक्षांशी कायम संघर्ष केला व आता शिवसेना त्यांच्याबरोबरच सत्तेत आहे. उद्धव ठाकरे यांचा तयारी असल्यास आमचे केंद्रीय नेते युतीबाबत विचार करतील, असे विधानही पाटील यांनी केले.

सरनाईक यांचे पत्र हा शिवसेनेचा अंतर्गत प्रश्न असल्याचे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले आहे. राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी महाविकास आघाडी सरकारला काहीही धोका नसल्याचे मत व्यक्त के ले. सरनाईक यांच्या पत्रामागील भावना काही वेगळी असावी. शिवसेनेतील नेते किं वा कार्यकर्ते मोठय़ा प्रमाणावर राष्ट्रवादी व काँग्रेसमध्ये प्रवेश के ल्याची उदाहरणे नाहीत, असेही जयंत पाटील म्हणाले.

शिवसेना प्रवक्ते , खासदार संजय राऊत यांनी या पत्रावर काही प्रतिक्रिया देण्याची गरज नसल्याचे सांगितले. आपल्याला त्रास होत असल्याचे सरनाईक यांनी पत्रात नमूद केले असून तो कोणाचा आहे, हे महत्वाचे असल्याचे स्पष्ट केले.

मुंबई महानगर क्षेत्रविकास प्राधिकरणातील घोटाळ्यात प्रताप सरनाईक हे आरोपी आहेत. तुरुंगात जाण्याच्या भीतीमुळेच ते भाजपशी युती करावी असे बोलू लागल्याची खोचक प्रतिक्रि या भाजपचे किरीट सौमैय्या यांनी व्यक्त के ली.

भाजपशी पुन्हा युती करावी, अशी मागणी शिवसेना आमदार प्रताप सरनाईक यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. काँग्रेसने स्वबळावर निवडणुका लढविणार असल्याचे ठरविले असून राष्ट्रवादी काँग्रेस शिवसेनेचेच नेते व कार्यकर्ते फोडत असल्याने आता भाजपशी जुळवून घ्यावे, असे मत सरनाईक यांनी व्यक्त केले आहे.

मुख्यमंत्री ठाकरे यांनी करोना काळात खंबीरपणे समर्थ नेतृत्व गेले दीड वर्षे दिले आहे. राजकारण बाजूला ठेवून मुख्य मंत्री काम करीत आहेत. मात्र काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसमुळे शिवसेनेला मुख्यमंत्रीपद मिळाले, असे त्यांना वाटत आहे. महाविकास आघाडी सरकारमधील मंत्री, नेते व सनदी अधिकारी हे केंद्रीय तपास यंत्रणांचा ससेमिरा टाळण्यासाठी छुपी हातमिळवणी करीत आहेत.

मुंबै बँक गैरव्यवहार प्रकरणी प्रवीण दरेकर यांच्या अडचणीत वाढ

विरोधी पक्षनेते म्हणून मी महाविकास आघाडी सरकारला जेरीस आणल्यामुळे सरकारने हे पाऊल उचलले आहे. हा विषय संपला असून, मी या प्रकरणाला काडीचीही किंमत देत नाही. –

प्रवीण दरेकर, विरोधी पक्षनेते, विधान परिषद

मुंबई, दि. २१ : मुंबई जिल्हा नागरी सहकारी बँकेतील १२३ कोटी रुपयांच्या गैरव्यवहारप्रकरणी मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे विभागाकडे दाखल गुन्ह्य़ाचा तपास बंद करण्यास महानगर दंडाधिकारी न्यायालयाने नकार दिला आहे. त्यामुळे विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर, माजी अध्यक्ष शिवाजी नलावडे यांच्यासह इतरांच्या अडचणीत वाढ होणार आहे. तपास बंद करण्याची परवानगी मागणारा 'सी समरी' अहवाल स्वीकारण्यास न्यायदंडाधिकाऱ्यांनी नकार दिला आहे.

मुंबई जिल्हा नागरी सहकारी बँकेतील (मुंबै बँक) या कथित गैरव्यवहारप्रकरणी 'लोकसत्ता'ने सर्वप्रथम वृत्त प्रसिद्ध केले होते. या प्रकरणी 'घोटाळ्यांची मुंबै बँक' अशी वृतमालिका ऑक्टोबर २०१३ मध्ये प्रसिद्ध केली होती. दरेकर २०१० पासून मुंबै बँकचे अध्यक्ष आहेत. १९९८पासून आतापर्यंत १२३ कोटींचा गैरव्यवहार झाल्याचा अहवाल राज्याच्या सहकार खात्याने दिला होता. तत्कालीन लेखानिरीक्षक दयानंद चिंचोलीकर यांनी या प्रकरणी दिलेल्या अहवालात गैरव्यवहाराची सविस्तर माहिती देण्यात आली होती. हा अहवाल स्वीकारण्यात आला होता.

या गैरव्यवहारप्रकरणी भारतीय जनता पक्षाचे विवेकानंद गुप्ता यांनी आर्थिक गुन्हे विभागाकडे तक्रार दाखल केली होती. अखेरीस २०१५ मध्ये आर्थिक गुन्हे विभागाने गुन्हा दाखल केला होता. सकृद्दर्शनी तक्रारीत तथ्य आढळले असून हा गुन्हा फौजदारी स्वरूपाचा असल्याचे स्पष्ट करीत त्यावेळी गुन्हा दाखल करण्यात आला होता. परंतु दरेकर यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आणि सत्ताधारी भाजप सरकारच्या काळात या गुन्ह्य़ाचा तपास थंडावला. आता तर या गुन्ह्य़ात तथ्य नसल्याचा 'सी समरी' अहवाल आर्थिक गुन्हे विभागाने ४७ व्या महानगर दंडाधिकाऱ्यांकडे सादर केला होता. त्यास पंकज कोटेचा यांनी आक्षेप घेतला. महानगर दंडाधिकाऱ्यांनी हा अहवाल स्वीकारण्यास नकार दिला असून काही मुद्दे उपस्थित केले आहेत. कोटेचा यांचे वकील अ‍ॅड. प्रदीप हवनूर यांनी त्यास दुजोरा दिला. साक्षांकित प्रत आपल्याला सोमवारी मिळेल, असे सांगितले.

''या प्रकरणातील मूळ तक्रारदार गुप्ता यांनी उच्च न्यायालयात जाऊन तक्रार मागे घेतल्यामुळे आता त्यात तथ्य नाही'', असा युक्तिवाद दरेकर यांनी केला आहे. मात्र याबाबत गुप्ता यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी आपण तक्रार मागे घेतलेली नाही, असे स्पष्ट केले. या प्रकरणात आपण मूळ तक्रारदार असून खटल्याच्या वेळी वस्तुस्थिती न्यायालयापुढे स्पष्ट करू, असेही त्यांनी 'लोकसत्ता'ला सांगितले. दरेकर आणि गुप्ता सध्या एकाच पक्षात असले तरी गुप्ता यांच्या या भूमिकेमुळे दरेकर अडचणीत येण्याची शक्यता आहे.

४७ व्या महानगर दंडाधिकाऱ्यांनी मुंबै बँकेशी संबंधित एका गुन्ह्य़ात 'सी समरी' अहवालाला मंजुरी दिली आहे. मात्र दुसऱ्या प्रकरणात काही मुद्दे उपस्थित केले आहेत. ज्यांनी आक्षेप घेतला आहे ते पंकज कोटेचा हे माझे राजकीय प्रतिस्पर्धी आणि शिवसेनेचे आमदार प्रकाश सुर्वे यांचे व्यावसायिक भागीदार आहेत. मुळात असा आक्षेप संस्थेचा सभासदच घेऊ शकतो, असे स्पष्टीकरण दरेकर यांनी दिले. न्यायालयाने उपस्थित केलेल्या मुद्दय़ांबाबत सविस्तर स्पष्टीकरण आर्थिक गुन्हे विभागाला देण्यात येणार आहे, असेही दरेकर यांनी सांगितले. या संदर्भातील कोटेचा यांची याचिका उच्च न्यायालयाने याआधीच फेटाळली आहे, असेही दरेकर यांनी नमूद केले.

'आर्थिक गुन्हे'च्या कार्यपद्धतीबद्दल शंका

गुन्ह्य़ात तथ्य नसल्याचा 'सी समरी' अहवाल स्वीकारण्यास न्यायदंडाधिकाऱ्यांनी नकार दिल्यामुळे आर्थिक गुन्हे विभागाच्या कार्यपद्धतीबद्दलही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. राजकीयदृष्टय़ा अडचणीचा ठरणारा तपास करायचाच नाही, अशीच या विभागाची पद्धत असल्याची चर्चा आहे. आता राज्यात सत्ताबदल झाल्यामुळे कदाचित दरेकर आणि इतरांविरुद्धच्या तपासात आर्थिक गुन्हे विभागाला तथ्य आढळू शकते, असा दावाही केला जात आहे.

ओबीसी आरक्षणाच्या तिढ्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर पडण्याची शक्यता

मुंबई, दि. २१ : ओबीसी आरक्षणाच्या तिढ्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर पडण्याची शक्यता आहे. ओबीसी आरक्षणाचा मुद्दा सुटेपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेऊ नये अशी ओबीसी नेत्यांची मागणी असून या मागणीवर मागणीवर सरकार सकारात्मक असल्याचं राज्याचे मदत आणि पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार यांनी प्रसमारमाध्यमांशी बोलताना सांगितलं आहे, दरम्यान यावेळी त्यांनी आरक्षणाचा प्रश्न सुटेपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होऊ देणार नाही असा इशाराही दिला आहे."यासंदर्भात मुख्यमंत्र्यांशी चर्चा झाली आहे. या चर्चेत मी आणि भुजबळ होतो. जोपर्यंत ओबीसीच्या आरक्षणाचा तिढा सुटत नाही तोपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेऊ नयेत अशी भूमिका आम्ही माडंली आहे. ही चर्चा सकारात्मक झाली आहे. निवडणुका पुढे ढकलण्याच्या चर्चेसंदर्भात सरकार सकारात्मक आहे. कोणाचा कितीही दबाब आला तरी ओबीसी आरक्षणाचा मुद्दा सुटेपर्यंत या निवडणुका होऊ नयेत आणि मंत्री असलो तरी या निवडणुका होऊ देणार नाही अशी आमची स्पष्ट भूमिका आहे," असं विजय वडेट्टीवार यांनी सांगितलं आहे.

दरम्यान यावेळी बोलताना विजय वडेट्टीवार यांनी करोना संपेपर्यंत मुंबई लोकल सर्वसामान्यांसाठी सुरु होणार नाही असं सांगितलं आहे. आमदार प्रताप सरनाईक यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिल्यानंतर शिवसेना पुन्हा भाजपासोबत जाण्याच्या चर्चेवर ते म्हणाले की, "काहीही झालं तरी पुढचे साडेतीन वर्षे उद्धव ठाकरे मुख्यमंत्री राहणार आहेत. कितीही ईडी आणि सीबीआयचा दबाव आणला तरी तुम्ही स्वप्न बघत राहा. आमची वाटचाल सुरूच राहील". केंद्रीय संस्था कशाप्रकारे वागत आहेत, हे दाखवण्यासाठी सरनाईक यांचं पत्र आहे असं वाटत असल्याचा टोलाही त्यांनी लगावला आहे.

काँग्रेसच्या स्वबळावर शिवसेनेचा टोला चव्हाण मुख्यमंत्री असतानाच जनतेनं त्यांना घरी बसविलं

मुंबई, दि. २१ : मागील काही दिवसांपासून काँग्रेसकडून स्वबळाचा नारा दिला जात असून, शिवसेनेनं पुन्हा एकदा स्वबळाच्या नाऱ्याचा समाचार घेतला आहे.'राज्याचा पुढचा मुख्यमंत्री काँग्रेसचाच करायचा आहे', असा निर्धार माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी व्यक्त केला. तर दुसरीकडे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष भाई जगताप यांच्याकडूनही सातत्याने स्वबळाचा नारा दिला जात आहे. राज्यातील महाविकास आघाडी सरकारमध्ये असलेल्या काँग्रेसकडून स्वतंत्र निवडणुका लढवण्याचे संकेत दिले जात असून, शिवसेनेनं यावर भाष्य करत समाचार घेतला आहे. "एखाद्या पक्षाने स्वबळाची भाषा करणे हे काही चुकीचे नाही. फक्त पायाखालची जमीन एकदा तपासून घेतली पाहिजे," असा सल्लाही शिवसेनेनं काँग्रेसला दिला आहे.काँग्रेसकडून स्वबळावर निवडणुका लढवण्याची भाषा केली जात असून, शिवसेनेनं सामना अग्रलेखातून यावर भाष्य केलं आहे. "करोनाचे संकट पाहता बेभान गर्दी आवरा, असे आदेश केंद्र सरकारने दिले त्याच धर्तीवर या संकटकाळात सुरू असलेले बेभान राजकारणही आवरा, नाही तर लोक जोड्याने हाणतील, असा कडक सूर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी लावला. शिवसेनेच्या ५५व्या वर्धापनदिनी पक्षप्रमुख काय बोलणार, काय सांगणार, काय गरजणार याकडे सगळ्यांचेच लक्ष लागले होते. पण शनिवारी संध्याकाळी गडगडाट होऊन विजा चमकाव्यात असे चमकदार भाषण करून उद्धव ठाकरे यांनी भविष्यातील मार्गाची दिशा दाखवली.

सर्वसामान्यांना मुंबई लोकलची प्रतीक्षाविजय वडेट्टीवारांनी केलं स्पष्ट

मुंबई, दि. २१ : मुंबईतील लोकल सेवा सर्वसामान्यांसाठी सुरू होण्यासाठी सामान्य मुंबईकरांना आणखी काही दिवस प्रतीक्षा करावी लागणार असल्याचं स्पष्ट होत आहे. राज्याचे मदत आणि पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार यांनी मुंबई लोकल इतक्यात सुरु होणार नसल्याचं स्पष्ट केलं आहे.मेमध्ये करोनाचा संसर्ग वाढत असताना मुंबईसह राज्यात पुन्हा लॉकडाऊनचा निर्णय घेण्यात आला. तेव्हा सर्वसामान्यांसाठी लोकलची दारे पुन्हा बंद झाली. मुंबईतील करोना रुग्णांची संख्याही आता आटोक्यात येत आहे. तसंच, काही प्रमाणात निर्बंधही शिथील करण्यात आले आहेत. त्यामुळं लोकल ट्रेन पूर्ण क्षमतेनं कधी सुरु होणार याकडे सर्वांचं लक्ष लागून राहिलं आहे. यासंदर्भात आज पालिकेची बैठकही होती. मात्र, त्याआधीच विजय वडेट्टीवार यांच्या वक्तव्यानं लोकल निर्बंध कायम राहतील, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.विजय वडेट्टीवार यांना मुंबईची लोकल कधी सुरु होणार असा प्रश्न विचारल्यानंतर त्यांनी करोना संपेपर्यंत मुंबईत लोकल सुरु होणार नाही, असं वडेट्टीवार यांनी म्हटलं आहे. 'राज्यातून करोना गेलेला नाही. काही जिल्ह्यात अजूनही करोनाची स्थिती चिंताजनक आहे. त्यामुळं स्वतःहून मृत्यूला आमंत्रण देऊ नये. सर्वांनी करोनाचे नियम पाळावेत,' असं आवाहन वडेट्टीवार यांनी केलं आहे.दरम्यान, राज्य सरकारने करोनानिर्बंध शिथिल करण्यासाठी आखलेल्या पाच निकषांनुसार मुंबई आता पहिल्या गटात पोहोचली आहे. तरीही मुंबईतील निर्बंध पूर्णपणे उठविण्यात आलेले नाहीत. एकीकडे लोकल प्रवासावर निर्बंध असल्याने हजारो-लाखो मुंबईकरांच्या नोकरी, व्यवसायावर संकट आहे. त्यामुळे काही प्रमाणात तरी निर्बंध कमी करण्याची मुंबईकरांची मागणी आहे.

थोडक्यात पुढील महिन्यात लसीकरणाला गती,अमित शहांची ग्वाहीअहमदाबाद : देशात जुलै - ऑगस्ट महिन्यापासून कोविड १९ विरुद्ध लसीकरणाला वेग मिळण्याची शक्यता केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी व्यक्त केलीय. गृहमंत्री सध्या दोन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर आहेत. सोमवारी सकाळी अहमदाबादमध्ये एका लसीकरण केंद्राचा दौरा केल्यानंतर ते बोलत होते. सोमवारी, अमित शहा यांनी गांधीनगरमधील राजभवनात राज्यपाल आचार्य देवव्रत यांचीही भेट घेतली.

'राष्ट्रवादी-शिवसेनेने युतीची घोषणा करावी, त्यांना शुभेच्छा

'मुंबई, दि. २१ : काँग्रेसने सर्वात जास्त महाराष्ट्रात काम केलं. कार्यकर्त्यांनी जीवाची पर्वा न करता ऑक्सिजनपासून प्लाझ्मापर्यंत सर्वच सोयी पुरविल्या. राहिली पक्षाची भूमिका आहे, तर सेनेनी देखील आम्ही स्वबळावर लढू, अशी मांडली. भाजपने देखील हीच भूमिका मांडली होती. आता आम्हाला आमचा पक्ष वाढवायचा असेल तर कोणाला त्रास का व्हावा? असा टोला नाना पटोले यांनी खासदार संजय राऊत यांना लगावला आहे.

ENBEE TRADE AND FINANCE LTD.
CIN No: L50100MH1985PLC036945
Regd. Office: B4/C5, Gods Gift Chs Ltd, N M Joshi Marg, Lower Parel, Mumbai – 400013, Maharashtra
Ph: 022-24965566, **Fax:** 022-24965566
Email Id: enbeetrade@gmail.com;
Website: www.enbeetrade.com

NOTICE

Pursuant to Regulation 29 of the SEBI (Listing Obligation and Disclosure Requirement) Regulations, 2015, Notice is hereby given that a meeting of the Board of Directors of the Company will be held on Monday, June 28, 2021 to consider, approve and take on record Standalone Audited Financial Results of the Company for the Quarter and year ended March 31, 2021.

For Enbee Trade and Finance Limited
Sd/-
Amar Narendra Gala
Managing Director
Place: Mumbai. **DIN: 07138963**
Date: June 21, 2021

पावसाळी अधिवेशन ५ जुलैपासूनआरक्षणासह अन्य विषय गाजणार

मुंबई, दि. २१ : राज्याचे पावसाळी अधिवेशन सोमवार ५ जुलैपासून मुंबईत होणार आहे. विधानसभेची बैठक सकाळी ११ वाजता तर विधान परिषदेची बैठक दुपारी १२ वाजता सुरू होईल. मराठा, ओबीसींसह पदोन्नतीमधील आरक्षणाचे विषय गाजण्याची शक्यता आहे. मराठा समाजाला राज्य सरकारने आरक्षण दिले होते. परंतु, सर्वोच्च न्यायालयाने ते असंवैधानिक ठरवत रद्द केले. यावरून राज्याचे राजकारण व समाजकारण चांगलेच ढवळून निघाले. मराठा समाजाने आंदोलन करण्याचा इशारा दिला. भाजपही यावरून सरकारवर निशाना साधण्याची संधी सोडताना दिसत नाही.

Royal Cushion Vinyl Products Limited
Regd office: 60 CD, Shlok, Government Industrial Estate, Charkop, Kandivali (W), Mumbai – 400 067,
Email: legalho83@gmail.com
Website: - www. rcvp.in,
CIN no: - L24110MH1983PLC031395

NOTICE

Pursuant to Regulation 29 read with Regulation 47 and other relevant regulations of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulation, 2015, notice is hereby that a Meeting of the Board of Directors of the Company is scheduled to be held on Wednesday, June 30, 2021 to interalia consider and approve the Audited Financial Results of the Company for the quarter and year ended 31st March, 2021.

A copy of the said notice is available on the Company's website at www.rcvp.in and also on the Stock Exchange website at www.bseindia.com.

For Royal Cushion Vinyl Products Limited
Sd/-
Jayesh Motasha
Director - 00054236
Place: Mumbai
Date : 21st June, 2021

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

ई-निविदा सूचना

पात्र निविदाधारकांकडून खालील कामासाठी ई-निविदा मागविण्यात येत आहे.

(१) निविदा क्र. काअस्था/वांद्रे/तांत्रिक/निविदा क्र. टी-१४/२०२१-२२.
(अ) कामाचे नांव : प्रकाशगड वांद्रे येथील पहिल्या मजल्याचा ए-विंगसाठी डिफ्यूझर्स, ग्रिल्स आणि डंपरच्या नवीन जागेसह नवीन एचव्हीएसी विदयमान डक्टिंगमध्ये बदल करणे. **(ब)** अंदाजीत खर्च रू. १५६७५६३=०० **(क)** अनामत रक्कम - रु. १६०००/- **ड)** निविदा किंमत = (निविदे प्रमाणे) **इ)** सुरक्षा ठेव रक्कम :- निविदा मूळ रक्कमेवर ५% कामाची कालमर्यादा :-

उपरोक्त कामाची तपशीलवार निविदा सूचना आमच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. संपूर्ण भरलेली निविदा दिनांक २२.०६.२०२१ ते २७.०६.२०२१ वेळ दुपारी १८.०० या कालावधीत उपलब्ध राहील. निविदा सादर करण्याची तारीख २२.०६.२०२१ ते २८.०६.२०२१ वेळ दुपारी २.०० वाजे पर्यत आहे.

निविदा संबंधीत सुधारीत पत्र बदल झाल्यास तो संबंधीत संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येईल. या बाबतची कोणतीही माहिती वृत्तपत्रात देण्यात येणार नाही. निविदाधारकांनी वेळोवेळी (www.mahadiscom.in) संकेत स्थळावर चेक करावे. E-tender support ID = support_etender@mahadiscom.in वर ई-मेल वर पाठवावा कुठलेही सुधारण पत्र वृत्तपत्रा ऐवजी संकेत करण्यात येईल.

या ई-निविदेकरीता किंवा पुढील ई-निविदेकरीता स्वत:ची नोंदणी करण्याची निविदाधारकांना विनंती करण्यात येत आहे.

कार्यकारी अभियंता (स्थापत्य), महावितरण
स्थापत्य विभाग, वांद्रे, प्रकाशगड, तळमजला, अनंत काणेकर मार्ग,
HO PR NO. 278 (21) वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.

बृहन्मुंबई महानगरपालिका

वृक्ष प्राधिकरण
-जाहिर सूचना-

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ (जानेवारी २०१८ सुधारलेला) कलम ८ (३) (क) मधील तरतूदी नुसार **परिमंडळ -१** मधील **'ई'** विभागातील **०२** प्रस्ताव, **परिमंडळ - २** मधील 'जी/उत्तर' विभागातील **०१** प्रस्ताव, 'एफ/उत्तर' विभागातील **०१** प्रस्ताव, **परिमंडळ-७** मधील 'आर/दक्षिण' विभागातील **०४** प्रस्ताव, 'आर/उत्तर' विभागातील **०१** म्हणजेच एकूण **०९** प्रस्ताव, म.न.पा. आयुक्त, अध्यक्ष वृक्ष प्राधीकरण / वृक्ष प्राधिकरण समिती यांचा मंजुरीकरिता प्राप्त झाले आहेत.

उपरोक्त प्रस्तांवामधील झाडे कापणे / पुर्नरोपित करणेबाबत तपशील हा म. न. पा. च्या mcgm.gov.in - बृहन्मुंबई महानगरपालिकेविषयी विभाग आणि खाते खातेनिहाय माहिती पुस्तिका उद्याने व वृक्ष प्राधिकरण कागदपत्रे १३० - Adv- ७ days - z - I, II, VII या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

कोविड-१९ च्या प्रार्दुभावामुळे नागरीकांना विनंती करण्यात येते की, सुनावणीसाठी उद्यान अधिक्षक कार्यालयात प्रत्यक्ष हजर न राहता, उपरोक्त प्रस्तावांविषयी आपले आक्षेप/सुचना उद्यान अधिक्षकांच्या sg.gardens@mcgm.gov.in या ईमेल आईडी वर दिनांक ३०/६/२०२१ पर्यंत पाठविण्यात याव्यात. तसेच विहित मुदतीत ई-मेल द्वारे सादर न झालेल्या आक्षेप / सूचनेचा विचार करण्यात येणार नाही यांची कृपया नोंद घ्यावी.

उद्यान अधिक्षक यांचे कार्यालय,
पेंग्विन इमारत, २ रा माळा,
वीरमाता जिजाबाई भोसले उदयान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग,
भायखळा (पूर्व) मुंबई- 400027.
दुरध्वनी क्र. २३७४२१६२
E.mail - sg.gardens@mcgm.gov.in

सही/-
उद्यान अधिक्षक
व वृक्ष अधिकारी
पीआरओ/५८०/जाहि./२०२१-२२

पाण्याचा अपव्यय टाळा-वाहत्या नळाखाली कपडे-भांडी धुऊ नका.

सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, मुंबई (परसेवेवर)
मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,
यशवंतराव चव्हाण नाट्य संकूल, बॉम्बे ग्लास वर्क्स समोर,
जे. के. सावंत मार्ग, माहीम, मुंबई - ४०००१६.

जाहीर नोटीस

मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., ... अर्जदार
मुंबई बँक भवन,
२०७, डी. एन. रोड, फोर्ट,
मुंबई - ४००००१.

Assistant Registrar Co-op. Soc.,
Recovery, Mahim (W).
Gen. Outward No. 424
Date : 16/06/2021

अनुक्रमांक १ ते ३१ ... जाब देणार

खालील दर्शविलेल्या जाब देणार यांना नोटीस देण्यात येते की थकित कर्जाविषयी अर्जदार बँकेने दाखल केलेल्या वसुली अर्जाबाबत तुमचे म्हणणे सादर करणेसाठी आपणास उपलब्ध पत्त्यावर नोटीस देण्यात आली होती. तथापि सदर पत्त्यावर आपण रहात नसल्याने तसेच आपला विद्यमान पत्ता उपलब्ध नसल्याने सदर नोटीसद्वारे आपणास एक शेवटची संधी देण्यात येत असून दिनांक **२१/०६/२०२१ रोजी दुपारी १२.३० वाजता** आपण स्वतः वरील पत्त्यावर हजर राहून आपले म्हणणे नमूद करावे. सदर दिवशी हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत अर्जाची चौकशी करण्यात येऊन या कार्यालयात एकतर्फी योग्य तो निर्णय घेतला जाईल याची आपण लक्षपूर्वक नोंद घ्यावी.

जाब देणार आणि दाखल केलेल्या दाव्यांची माहिती खालीलप्रमाणे

अ. क्र.	जाब देणाऱ्याचे नाव	जाब देणार क्रमांक	अर्ज दाखल दिनांक	दावा अर्ज क्रमांक	दावा रक्कम रुपये	पुढील सुनावणी तारीख
१	सुधाकर हवंगीअप्पा बेलकुंदे	१	२४.०५.२१	५२	११८९७५	२९.०६.२१
२	राजेश आनंद पवार	२	२४.०५.२१	५२	११८९७५	२९.०६.२१
३	प्रविण पांडुरंग परब	१	२४.०५.२१	५३	१८१५९९५	२९.०६.२१
४	पूजा प्रविण परब (सहकर्जदार)	२	२४.०५.२१	५३	१८१५९९५	२९.०६.२१
५	माधव यशवंत कृष्णा	३	२४.०५.२१	५३	१८१५९९५	२९.०६.२१
६	अशोक नारायण जंगम	१	२४.०५.२१	५४	५९७५९०	२९.०६.२१
७	जैन टुर्स अँड ट्रॅव्हल (प्रो.प्रा. जुनेद ए शेख)	१	२४.०५.२१	५५	१९६३८७	२९.०६.२१
८	अनवर मोहम्मद शेख	२	२४.०५.२१	५५	१९६३८७	२९.०६.२१
९	विजय पांडुरंग पोळ	१	२४.०५.२१	५६	१५५५३८	२९.०६.२१
१०	सुभाष भाऊ आंबेकर	२	२४.०५.२१	५६	१५५५३८	२९.०६.२१
११	भगवान रावजी भोवर	१	२४.०५.२१	५७	७८६०७	२९.०६.२१
१२	शैलेश लालजी मोहिते	२	२४.०५.२१	५७	७८६०७	२९.०६.२१
१३	सत्यवान गेनप्पा गाडेकर	१	२४.०५.२१	५८	५९३२३०	२९.०६.२१
१४	जोखाईराम झुरीराम जैसवार	१	२४.०५.२१	५९	८५३२८७	२९.०६.२१
१५	शिवशंकर सहदेव जैसवार	२	२४.०५.२१	५९	८५३२८७	२९.०६.२१
१६	अमित काशीराम आयरे	१	२४.०५.२१	६०	१४७९१८	२९.०६.२१
१७	अमित पुरुषोत्तम गुण्ये	२	२४.०५.२१	६०	१४७९१८	२९.०६.२१
१८	स्वप्निल गोरखनाथ माने	१	२४.०५.२१	६१	२०८५८४	२९.०६.२१
१९	अन्ना दुराईअरुणाचलम नाल्लाप्पान	२	२४.०५.२१	६१	२०८५८४	२९.०६.२१
२०	राजेश रामनाथ धारकर	१	२४.०५.२१	६२	१८५४१६	२९.०६.२१
२१	अमित चंद्रकांत दळी	२	२४.०५.२१	६२	१८५४१६	२९.०६.२१
२२	विजय मुरलीधर भालेराव	१	२४.०५.२१	६३	६३१६९६	२९.०६.२१
२३	अमित विनायक राणे	१	२४.०५.२१	६४	२७१०३२	२९.०६.२१
२४	संजय भगवान यादव	२	२४.०५.२१	६४	२७१०३२	२९.०६.२१
२५	राहुल लक्ष्मण दळवी	१	२४.०५.२१	६५	१२०५१९	२९.०६.२१
२६	कुणाल लक्ष्मण दळवी	२	२४.०५.२१	६५	१२०५१९	२९.०६.२१
२७	करिश्मा नितीन शहा	३	२४.०५.२१	६५	१२०५१९	२९.०६.२१
२८	सुजाता संजय राणे	१	२४.०५.२१	६६	१०१९४२२	२९.०६.२१
२९	संजय मधुसूदन राणे	२	२४.०५.२१	६६	१०१९४२२	२९.०६.२१
३०	महेश वासुदेव रासम	३	२४.०५.२१	६६	१०१९४२२	२९.०६.२१
३१	अनुश्री अरविंद सावंत	४	२४.०५.२१	६६	१०१९४२२	२९.०६.२१

ही नोटीस आज दिनांक १६/०६/२०२१ रोजी माझे सही व कार्यालयाचे मुद्रेसह दिली आहे.

शिक्का

सही/-
श्री. ए. एच. भंडारे
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (परसेवेवर)
दि. मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., मुंबई